जांबुवंत महाराज शिक्षण संस्था, खोकडापूरा, औरंगाबाद संचलित कै. बाबासाहेब पाटील माध्यमिक शाळा, सिरनेर, ता. अंबड, जि. जालना शाळेचे लाडसावंगी, ता. जि. औरंगाबाद येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१८/प्र.क्र.४६२/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

वाचा :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : माशास्थ २०१२/(५९/१२) माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :

विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचे क्र.शिउसंऔ/मावि-१/ २०१८-१९/२२२/२५, दिनांक २४ जानेवारी, २०१९ चे पत्र

प्रस्तावना :-

जांबुवंत महाराज शिक्षण संस्था, खोकडापूरा, औरंगाबाद संचलित कै. बाबासाहेब पाटील माध्यमिक शाळा, सिरनेर, ता. अंबड, जि. जालना या मराठी विनाअनुदानित माध्यमिक शाळेचे लाडसावंगी, ता. जि. औरंगाबाद येथे स्थलांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेची इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्यामुळे स्थलांतर प्रस्तावित केले आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे. :-

(१) शाळा स्थलांतर शुल्क रु.१०,०००/- चा भरणा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचेकडे चलनाव्दारे करणे आवश्यक राहील.

(२) सदर शाळा स्थलांतरामुळे सध्याच्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(३) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(४) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(५) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(६) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(७) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्रमांक (१) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत ४ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०२१०९०१५३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.09.23 17:03:41 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना
४. अध्यक्ष/ सचिव, जांबुवंत महाराज शिक्षण संस्था, औरंगाबाद
५. निवडनस्ती (एसएम-१).